# <u>नि.दि.मु.क्र.११३/२०२२ मधील निशाणी क्र.८४ वरील आदेश</u>
# <u>(**CNRNo.MHSI**080009642022)</u>

०१. सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.०३ व ०५ यांनी त्यांचे विरुध्द झालेला ''एकतर्फा'' आदेश रद्द करुन, त्यांची कैफीयत दाखल करून घेण्यासाठी परवानगी मिळणेस विनंती केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत दाव्यातील प्रतिवादी क्र.०३ व ०५ यांनी वेळीच आपली कैफियत दाखल न केल्यामुळे प्रतिवादी क्र.०३ व ०५ यांचेविरुध्द दि.२८०/२०२४ रोजी दावा एकतर्फा चालवण्याबाबत आदेश केला आहे. प्रतिवादी क्र.३ ही आपल्या सासरी राहते. तर प्रतिवादी क्र.५ हिचे गुडघ्याचे ऑपरेशन झाले असून दोन्ही गुडघ्याच्या वाट्या बदलल्या आहेत. प्रतिवादी क्र.५ हिच्यावर आजही उपचार सुरु आहेत. त्यामुळे, तीचे फिरणे बंद झाले होते. त्यामुळे, कागदपत्रे मिळवणे, प्रवास करणे व वकिलांची भेट घेऊन आपली कैफियत देऊन न्याय बाजू मांडणे वेळीच शक्य झाले नाही. प्रस्तूत प्रतिवादी यांनी दाव्याचे कामी कैफियत दाखल करणेस जाणूनबुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी यांना त्यांची न्याय बाजू मांडणेस संधी न मिळाल्यास त्यांचे न्याय हक्कावर बाधा निर्माण होणारी आहे. सबब, त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होऊन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

०२. वादीने सदर अर्जावर आपले म्हणणे नि.क्र.८६ वर दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तूत प्रतिवादी यांनी समन्स बजावणी होऊन देखील जाणीवपूर्वक दाव्यास विलंब होण्याकरीता हजर होऊन त्यांची कैफियत मुदतीत दिलेली नाही. अर्जात नमुद विधाने खोटी व खोडसाळ आहेत. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा. अर्ज मंजूर करण्याचा झाल्यास वादीस प्रतिवादीकडून जास्तीत जास्त रक्कम देण्यात यावी अशी

विनंती वादीने केली आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०४. सदर दावा वाटपाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा अंतिमतः निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास सर्व निर्णायक वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यामुळे, अर्जदार/प्रतिवादीस त्यांचे कथन अभिलेखावर दाखल करण्याची संधी देणे आवश्यक आहे. तसे न केल्यास त्यांचे अपरीमित नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रतिवादी/अर्जदार यांचेकडून झालेल्या विलंबाची नुकसान भरपाई म्हणून वादीला खर्च देण्याबाबत आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**:: <u>आदेश</u> ::**

१. निशाणी क्र.८४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.०३ व ०५ यांनी खर्च म्हणुन रक्कम रु.५००/– (रूपये पाचशे फक्त) वादीस द्यावेत.

३. आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यत न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

SHUBHAM GOVIND LATURIYA

Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA Date: 2025.06.26 10:39:51 +0530

स्थळ : वैभववाडी

दिनांक : २५/०६/२०२५

(शुभम जी. लटुरिया)

न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय, वैभववाडी.